# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१ फॅक्स : २२६९०००७

E-mail : desk12@dte.org.in/12desk@gmail.com web : http://www.dtemaharashtra.gov.in


क्रमांक : क्र. १२/आस्था/२०१६/२६९९

दिनांक : 8 SEP 2016

प्रति

सहसंचालक

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर

विषय :- संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय व तंत्रनिकेतनांतील कार्यशाळेत कार्यरत असलेल्या कर्मचा-यांनी कर्तव्ये पार न पाडल्यास पर्यायी व्यवस्था करणेबाबत

संदर्भ :- १) उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक : पदनामे-२०१२/(४५/१२)/तांशि-२, दि. ०१/०६/२०१२

२) संचालनालयाचे परिपत्रक क्र. १२/आस्था/२०१६/२५६३, दिनांक : २४/०८/२०१६

३) संचालनालयाचे परिपत्रक क्र. १२/आस्था/२०१६/२६७४, दिनांक : ०८/०९/२०१६

या संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय व तंत्रनिकेतनांतील कार्यशाळेत कार्यरत असलेल्या कर्मचा-यांनी संदर्भ क्रमांक १ च्या शासन निर्णयात नमूद कर्तव्ये पार पाडणेबाबत संदर्भ क्रमांक २ व ३ च्या परिपत्रकानुसार यापूर्वी सूचित करण्यात आलेले आहे.

संदर्भ क्रमांक २ च्या परिपत्रकानुसार प्रशासकीय कार्यवाही अवगत करुन देखील संबंधीत कर्मचा-यांनी त्यांची कर्तव्ये पार पाडण्यास नकार दिल्याने विद्यार्थी कौशल्य विकसनापासून वंचित राहून त्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. चालू शैक्षणिक सत्र संपण्यास अल्प कालावधी शिल्लक राहीलेला आहे. विद्यार्थ्यांचे वर उल्लेख केल्याप्रमाणे शैक्षणिक नुकसान होवू नये म्हणून प्राचार्य व कर्मशाळा अधिक्षक यांनी पर्यायी व्यवस्था करुन या सत्रातील सर्व प्रात्यक्षिके पूर्ण करुन घ्यावीत.

कालमर्यादा विचारात घेवून त्वरीत कार्यवाहीबाबत सर्व संस्थाप्रमुखांना आपल्या स्तरावरुन सूचित करण्यात यावे.

( डॉ. सुभाष महाजन )

संचालक, तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत :- सर्व प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये व शासकीय तंत्रनिकेतने यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना (संबंधित विभागीय कार्यालयामार्फत)

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - २६२ ०६०१, २६९ ०६०२, २६४११५०/५१, फॅक्स - २६९०००७

E-mail : 12desk@gmail.com Internet :www.dte.maharastra.gov.in


**परिपत्रक**

क्रमांक : १२/आस्था/२०१६/२६७४

दिनांक : 28 SEP 2016

**विषयः संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये व तंत्रनिकेतनातील कर्मशाळेत कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांनी शासन निर्णयानुसार कर्तव्ये पार पाडणेबाबत**

संदर्भ : १) उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन निर्णय क्र. पदनामे-२०१२/(४५/१२)/तांशि-२, दि. १.६.२०१२

२) संचालनालयाचे परिपत्रक क्र. १२/आस्था/२०१६/२५६३, दि. २४.८.२०१६

संचालनालयाचे असे निदर्शनास आले आहे की, संचानलनालयातंर्गत शासकीय तंत्रनिकेतने व शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये यामधील कर्मशाळेतील तांत्रिक कर्मचाऱ्यांनी दि. २७.७.२०१६ पासून संदर्भिय क्र. १ च्या शासन निर्णयामध्ये विहीत करण्यात आलेली कर्तव्ये व जबाबदाऱ्या पार पाडणे थांबविले आहे. या अनुषंगाने विभागीय कार्यालये व प्राचार्यांकडे संबंधित कर्मचा-यांकडून प्राप्त झालेल्या त्यांच्या निवेदनांमध्ये कर्मशाळेतील कर्मचाऱ्यांनी मूळ अर्ज क्र. १४०/२०१२ मध्ये मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण मुंबई यांनी दिलेल्या न्यायनिर्णयाच्या अनुषंगाने सदरहू कामकाज बंद केल्याचे नमूद केले आहे. मा. न्यायाधिकरणाच्या सदर निर्णयाचा अभ्यास करता न्यायनिर्णयामध्ये शासन निर्णयात नमूद कर्तव्ये व जबाबदाऱ्या पार न पाडण्याबाबत नमूद केलेले नाही. सदर न्यायनिर्णयामध्ये मा. न्यायाधिकरणाने दि. १.६.२०१२ रोजीच्या शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या कर्तव्य व जबाबदाऱ्यांवर शिक्कामोर्तब केलेले आहे. म्हणजेच त्यानुसार कर्तव्य व जबाबदाऱ्या पार पाडणे बंधनकारक आहे. त्यास अनुसरुन, त्यांनी शासन निर्णय दि. १.६.२०१२ नुसार आपली कर्तव्ये व जबाबदा-या कसोशिने पार पाडाव्यात.

संदर्भिय शासन निर्णयामध्ये नमूद केलेली कर्तव्ये व जबाबदाऱ्या पहाता त्यामध्ये कर्तव्ये सुस्पष्टपणे नमूद केलेली आहेत. यामध्ये इतर कर्तव्यांसोबतच प्रामुख्याने **विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिके पूर्ण करण्यास मार्गदर्शन करणे, प्रात्यक्षिके पूर्ण करुन घेणे, प्रात्यक्षिकाचा अहवाल कार्यदेशकास/ प्रभारकास सादर करणे** हे नमूद केलेले आहे. त्यानुसार सर्व संबंधित कर्मचा-यांनी सदरहू कर्तव्ये पार पाडणे विद्यार्थ्यांच्या हिताच्या दृष्टीकोनातून आवश्यक आहे. सबब यामध्ये कर्मचाऱ्याने कसूर केल्यास महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम ३ चा भंग होतो, त्यामुळे सदरचे कर्मचारी महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ च्या संबंधित तरतुदीनुसार शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र ठरतील व याची संपूर्ण जबाबदारी संबंधित कर्मचाऱ्याची राहील. त्यास अनुसरुन दि. १.६.२०१२ रोजीच्या शासन निर्णयात नमूद केल्यानुसार कर्तव्ये पार पाडावीत. दि. २७.७.२०१६ पासून विद्यार्थ्यांची प्रलंबित असलेली प्रात्यक्षिके अधिकच्या कालावधीत थांबून अथवा सुट्टीच्या दिवशी उपस्थित राहून कर्मचाऱ्यांनी पूर्ण करुन घ्यावीत. यामध्ये प्रकर्षाने नमूद करण्यात येते की, कोणत्याही परिस्थितीत विद्यार्थी कौशल्य विकसनापासून वंचित राहणार नाहीत याची खबरदारी घेणबाबत तसेच उपरोक्त प्रमाणे नमूद केल्यानुसार संबंधित कर्मचाऱ्यांनी त्यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या पार पाडल्या नाहीत तर त्यांच्या कर्तव्यातील कसूरतेबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल, याची गांभीर्यांने नोंद घेणेबाबत संदर्भिय २ च्या परिपत्रकान्वये सूचित करण्यात आले होते.

१) निवेदन दिल्याच्या दिनांकापासूनचा कालावधी विनावेतन करणे

२) सदरील कर्तव्य कसूर केलेला कालावधी सेवाखंड म्हणून धरणे

३) सदरील सेवाखंड कालावधी निवृत्तीवेतनासाठी अग्राह्य धरणे इ.

तद्नंतरही संबंधित कर्मचाऱ्यांनी त्यांच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्यांमध्ये कसूर केल्यास त्यांचेवर महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम ३ चा भंग केल्याबद्दल महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ अन्वये त्यांचेवर कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल. याकरिता संबंधित कर्मचारी स्वतःच वैयक्तिकरित्या जबाबदार राहतील, असेही संदर्भिय २ च्या परिपत्रकान्वये सूचित करण्यात आले होते.

तथापि, संचालनालयांतर्गत शासकीय तंत्रनिकेतने व शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये यामधील कर्मशाळेतील तांत्रिक कर्मचारी संस्थांमधील विद्यार्थ्यांचे प्रात्यक्षिके घेत नसल्याचे सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाने व प्राचार्यांनी संचालनालयास कळविलेले आहे. कर्मशाळेतील कर्मचाऱ्यांनी प्राचार्यांना याबाबत निवेदने सादर केलेली आहेत, त्यांच्या निवेदनातील नमूद वस्तुस्थिती योग्य नसून त्यांची काम करण्याबाबतची नकारात्मक भुमिका दिसत असून कर्तव्यात कसूर करीत असल्याचे दिसून येते तसेच त्यांची सदरची कृती नियमबाह्य आहे. तरी, सर्व संबंधित कर्मचाऱ्यांना या परिपत्रकान्वये पुन्हा सूचित करण्यात येते की, त्यांनी संस्थांमध्ये विद्यार्थ्यांची शासन निर्णयात नमूद प्रमाणे प्रात्यक्षिके घ्यावीत. जेणेकरुन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही. सदर न्यायालयीन प्रकरणापूर्वी कर्मशाळेतील तांत्रिक कर्मचारी नियमित कर्तव्ये पार पाडत होती त्याच प्रमाणे विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानून आताही कर्तव्ये पार पाडावीत. कर्मशाळेतील साहीत्य (Tools) काढून देणे व नंतर ठेवणे ही कामे चतुर्थ श्रेणीतील कर्मचारी सुध्दा करु शकतात याकरीता औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील संबंधीत ट्रेडमधील प्रशिक्षित कर्मचा-यांची आवश्यकता नाही. संबंधीत ट्रेडमधील प्रशिक्षित कर्मचा-यांनी प्रात्यक्षिके घेणेच आवश्यक आहे. तरी त्याप्रमाणे संबंधित कर्मचाऱ्यांनी आपली कर्तव्ये पार पाडावीत.

सर्व संस्थाप्रमुखांना निर्देश देण्यात येतात की, सदरहू परिपत्रक संबंधित कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणावे. जे कर्मचारी दि. १.६.२०१२ रोजीच्या शासन निर्णयात नमूद विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिके देण्यासह कर्तव्ये व जबाबदाऱ्या पार पाडणार नाहीत त्या कर्मचाऱ्यांचे नाव व पदनामासह अहवाल तात्काळ विभागीय कार्यालयास सादर करावा.

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत,

१) सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर, त्यांना कळविण्यात येते की, त्यांनी त्यांचे विभागातील सर्व शासकीय संस्थांमधील प्राचार्यांना निर्देश देऊन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मागवून नियुक्ती प्राधिकारी म्हणून संबंधित कर्मचाऱ्याविरुध्द परिपत्रकात नमूदप्रमाणे कार्यवाही करावी.
२) सर्व प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये व शासकीय तंत्रनिकेतने यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना (संबंधित विभागीय कार्यालयामार्फत)